शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

---

## शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद पालघर

जिल्हा परिषद पालघर सेसफंड योजना सन 2018-19 अंतर्गत जिल्हा परिषद शाळा संलग्न इयत्ता 9 वी व इ. 10 वी च्या सुरु करण्यात आलेल्या वर्गावर रिक्त असलेल्या माध्यमिक शिक्षकांची पदे तसेच ऊर्दू माध्यमाच्या इ. 1 ली ते इ. 8 वी ऊर्दु माध्यमाच्या शाळेत अत्यावश्यक ठिकाणी शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात पुढील कमाल 08 महिन्याच्या कालावधीकरीता एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणा-या उमेदवारानी **दिनांक 28/09/2018 रोजी सायंकाळी 5.00 वाजता मूळ कागदपत्रासह आवेदन पत्र शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर** येथे जमा करावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | मासिक एकत्रित मानधन | शैक्षणिक व्यावसायिक अर्हता | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक शिक्षक (ऊर्दू माध्यम) | 6000 रुपये | एच.एस.सी व डी.एल.एड./डी.एड. | 32 |
| 2 | सहाय्यक शिक्षक (ऊर्दू माध्यम) | 8000 रुपये | बी.एस्सी. बी.एड (विज्ञान) | 1 |
| 3 | सहाय्यक शिक्षक (ऊर्दू माध्यम) | 8000 रुपये | बी.एस्सी. बी.एड (गणित) | 1 |
| 4 | सहाय्यक शिक्षक (ऊर्दू माध्यम) | 8000 रुपये | बी. ए. बी.एड (इंग्रजी), | 1 |
| 5 | सहाय्यक शिक्षक (मराठी माध्यम) | 8000 रुपये | बी.एस्सी. बी.एड (गणित) | 7 |

1. इयत्ता 9 वी व 10 वीच्या माध्यमिक शिक्षकांसाठी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक व व्यवसायिक अटी पुर्ण करणा-या उमेदवारांना **पदवी व बी.एड.** मध्ये असलेल्या **गुणांच्या टक्केवारीच्या** आधारे नियुक्ती देण्यात येईल. तसेच ऊर्दु माध्यम शिक्षकांसाठी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक व व्यवसायिक अटी पुर्ण करणा-या उमेदवारांना **एच.एस.सी व डी.एल.एड./डी.एड.** मध्ये असलेल्या **गुणांच्या टक्केवारीच्या** आधारे नियुक्ती देण्यात येईल.
2. नियुक्ती पूर्वी उमेदवारांकडून शासनाकडील **विहित नमुन्यात करारनामा** करण्यात येईल.
3. कर्मचा-यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोपपत्र नसल्यांचे प्रमाणपत्र स्वतंत्र सादर करावे लागेल.
4. सदर पदांच्या संख्यामध्ये बदल करण्याचा अधिकार निवड समितीस राहील.
5. मानधन पध्दतीने नियुक्त केलेल्या शिक्षकांची सेवा करारपत्रात नमुद केलेल्या कालावधी नंतर आपोआप संपुष्टात येईल.
6. सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे भविष्यात पुर्ननियुक्ती अथवा पदस्थापना कामी किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तसेच न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार संबंधित उमेदवारांस राहणार नाही.
7. इयत्ता 9 वी व 10 वीच्या माध्यमिक शिक्षकांसाठी बी.ए.बी.एड (इंग्रजी), बी.एस.सी.बी.एड (विज्ञान) व बी.एस.सी.बी.एड (गणित) या विषयाच्या उमेदवारांनी अर्ज करावेत. तसेच ऊर्दु माध्यम शिक्षकांसाठी ऊर्दु माध्यमातून **डी.एल.एड./डी.एड.** झालेल्या उमेदवारांनी अर्जा सह हजर रहावे.
8. इयत्ता 9 वी व 10 वीच्या माध्यमिक शिक्षकांसाठी पदवी व बी.एड. परिक्षेमध्ये **किमान 50%** गुण असणे आवश्यक आहे. तसेच ऊर्दु माध्यम शिक्षकांसाठी **एच.एस.सी व डी.एल.एड./डी.एड.** परिक्षेमध्ये **किमान 50%** गुण असणे आवश्यक आहे.
9. इयत्ता 9 वी व 10 वीच्या माध्यमिक शिक्षकांसाठी गणित, विज्ञान किंवा इंग्रजी हे विषय पदवीस **ऐच्छिक** असणे आवश्यक आहे.
10. उमेदवार जास्त संख्येने उपस्थित राहील्यास **पदवी व बी. एड.** अथवा **डी.एल.एड./डी.एड.** परिक्षेतील प्रात्यक्षिक गुण वगळता **लेखी गुणाच्या(Theory Mark)** टक्केवारीच्या आधारे निवड केली जाईल.
11. जर पदवी, बी. एड. डी.एल.एड. अथवा डी. एडच्या परिक्षेत विदयापीठाने श्रेणी स्वरुपात गुणांकन केले असल्यास सदर श्रेणीचे विदयापीठाकडून गुणांत रुपांतर करुन आणण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

---

12. सदर योजना ही जिल्हा परिषद स्वनिधीतून असल्याने स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. त्यांसाठी पालघर जिल्हयातील कायम रहिवासी असणे आवश्यक आहे. समक्ष अधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र/आधारकार्ड/पासपोर्ट/निवडणूक ओळखपत्र/रेशनकार्ड/इत्यादी शासनमान्य पुरावा स्वक्षांकित जोडणे आवश्यक आहे.
13. निवड प्रक्रियेमध्ये स्थानिक उमेदवाराबाबत काही साशंकता निर्माण झाल्यास अथवा हरकत असल्यास उमेदवार हा पालघर जिल्हयातील कायम रहिवासी असल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.
14. इयत्ता 9 वी व 10 वीच्या माध्यमिक शिक्षकांसाठी मानधन प्रतिमहा रक्कम रु. 8000/- (अक्षरी रुपये आठ हजार मात्र) कमाल 09 महिन्याकरीता देय असेल त्याशिवाय अतिरिक्त वेतन व भत्ते देय राहणार नाही.
15. ऊर्दु माध्यम शिक्षकांसाठी मानधन प्रतिमहा रक्कम रु. 6000/- (अक्षरी रुपये सहा हजार मात्र) कमाल 09 महिन्याकरीता देय असेल त्याशिवाय अतिरिक्त वेतन व भत्ते देय राहणार नाही.
16. उमेदवारांनी विहीत नमुन्यातील आवेदन पत्र (A-4 साईज मध्ये) सोबत अलीकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो, सर्व स्व-साक्षांकित प्रमाणपत्र व पुरावे सोबत सादर करणे आवश्यक आहे.
17. सदर शाळा या जिल्हयातील दुर्गम भागात असल्याने सदर ठिकाणी काम करण्याची तयारी असलेल्या उमेदवारांनी अर्ज करावेत.
18. **सदर अर्जामध्ये सादर केलेली माहिती खोटी असल्यास तसेच निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही स्वरुपाची शिफारस अथवा दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराला निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.**
19. अर्जाचा नमुना www.zppalghar.in व www.zppalghar.gov.in तसेच जिल्हाधिकारी यांच्या www.palghar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विहित नमुन्यात अर्ज न करणा-या व अपु-या कागदपत्रासह अर्ज सादर करणा-या उमेदवारांचे अर्ज विचारत घेतले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| 1 | प्रत्यक्ष कागदपत्र तपासणी तथा अर्ज सादर करणे | 19/09/2018 ते 27/09/2018 सायं 5 वाजेपर्यत |
| 2 | अर्जाची छाननी करणे | 28/09/2018 ते 29/09/2018 |

सही
सचिव निवड समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद पालघर

सही
अध्यक्ष निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

---

## शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद पालघर

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संलग्न इ. 9 वी व इ. 10 वीच्या वर्गासाठी सहाय्यक शिक्षक पदाकरिता अर्ज 2018-2019

(विषय - बी. ए. बी.एड (इंग्रजी)/बी.एस्सी. बी.एड (विज्ञान)/बी.एस्सी.बी.एड (गणित))

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र........... दिनांक ..........

प्रती,

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद पालघर

फोटो

विषय :- जिल्हा परिषद प्राथमिक संलग्न इ. 9 वी व इ. 10 वीच्या वर्गासाठी सहाय्यक शिक्षक पदाकरीता अर्ज 2018-19

1. उमेदवराचे नाव :- ..............................................................................
2. सध्याचा पत्ता :- ..............................................................................
..............................................................................
..............................................................................
3. कायमचा पत्ता :- ..............................................................................
..............................................................................
..............................................................................
4. जन्मतारीख :- वय ........... महिना......... दिवस.......
5. अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पदवी (............) | | | | | |
| 2 | व्यावसायिक पदवी | | | | | |

(पदवी मधील विषय नमुद करावा.)

6. स्थानिक उमेदवार आहात काय? होय/नाही.
(स्थानिक उमेदवार असल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.)

अर्जासोबत सादर केलेले प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडत आहे.

1) पदवी गुणपत्रक, 2) पदवी प्रमाणपत्र, 3) व्यावसायिक पदवी गुणपत्रक, 4) व्यावसायिक पदवी प्रमाणपत्र, 5)अभियोग्यता चाचणी गुणपत्रक, 6) रहिवासी दाखला, 7)आधारकार्ड 8) ...........................

### प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करते/करतो की सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रदद करण्यात यावी त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :-
स्थळ :-

सही/-
(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)

शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

---

## शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद पालघर

जिल्हा परिषद ऊर्दु माध्यमाच्या इ 1 ली ते इ 8 वी च्या शाळेत सहाय्यक शिक्षक पदाकरिता अर्ज 2018-2019
पदनाम :- सहाय्यक शिक्षक (ऊर्दू माध्यम)

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र........... दिनांक ...........

प्रती,

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद पालघर

फोटो

विषय :- जिल्हा परिषद ऊर्दु माध्यमाच्या इ 1 ली ते इ 8 वी च्या शाळेत सहाय्यक शिक्षक पदाकरिता अर्ज 2018-2019

1. उमेदवराचे नाव :- ..........................................................................................
2. सध्याचा पत्ता :- ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
3. कायमचा पत्ता :- ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
4. जन्मतारीख :- वय ............ महिना......... दिवस.......
5. अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 12 वी | | | | | |
| 2 | व्यावसायिक पदविका | | | | | |

(पदवी मधील विषय नमुद करावा.)

6. स्थानिक उमेदवार आहात काय? होय/नाही.
(स्थानिक उमेदवार असल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.)

अर्जासोबत सादर केलेले प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडत आहे.
1) बारावी गुणपत्रक, 2) बारावी प्रमाणपत्र, 3) व्यावसायिक पदविका गुणपत्रक, 4) व्यावसायिक पदविका प्रमाणपत्र, 5) रहिवासी दाखला, 6)आधारकार्ड 7) ...........................

### प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करते/करतो की सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रदद करण्यात यावी त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :-
स्थळ :-

सही/-
(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)